**L. A. BILL No. XXXVIII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २९ जून, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

**आणि, ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे

आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १७ जून २०२६ रोजी महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६ हा, प्रख्यापित केला होता ; २०२६ चा महा. अध्या. ९.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १७ जून २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा**

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा. **२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात ज्याचा निर्देश, "मुंबई महानगरपालिका अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५ब मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १८८८ चा ३.

"परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. .

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३७ ची सुधारणा. **३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (२अ) मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. .

प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा. **४.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५ब मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे २०२६ चा महा. .

घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

**५.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (१ब) मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ ची सुधारणा.

२०२६ चा महा. . "परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण चार

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा

**६.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ९अ मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

२०२६ चा महा. . "परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती परिषद सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

(शा.म.मु.) एचबी ०८५५–२ (२५०—०७-२०२६)

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१-१ब ची सुधारणा.

**७.** महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१-१ब मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु तसेच, अशी व्यक्ती दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर परंतु महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आली असेल, आणि जर त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती अध्यक्ष म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. .

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती.

**८.** (१) महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२६ चा महा. अध्या. ९.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. १८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८.]**

**[ मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (नगरविकास).**]**

**(विधानसभेने दिनांक २९ जून, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव–३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.